तरुण भारत मंगळवार, ११ जानेवारी २०२२

# सहकाराची मूलतत्वे जपल्याने 'रवळनाथ'ची प्रगती

## महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष महेश धर्माधिकारी यांचे प्रतिपादन : गडहिंग्लजला रवळनाथ हौसिंग सोसायटीतर्फे सभासद प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी
गडहिंग्लज

रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक सुचना व नियमांचे पालन, पारदर्शक कारभार, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व समाजिक बांधिलकीसह सहकारातील मूलतत्वे जपल्यामुळेच रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची अल्पावधीतच चौफेर प्रगती झाल्याचे प्रतिपादन कोल्हापूर येथील महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष, चार्टर्ड अकौंटंट महेश धर्माधिकारी यांनी केले.

राष्ट्रीय सहकारी संघ आणि रवळनाथ को-ऑप हौसिंग सोसायटीच्या वतीने आयोजीत सभासद प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. राजन गवस, ॲड. बी. बी. घाटगे यांची प्रमूख उपस्थिती होती. सुरवातीस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. स्वागत डॉ. दत्ता पाटील यांनी केले.




गडहिंग्लज : सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना महेश धर्माधिकारी. शेजारी डॉ. राजन गवस, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, ॲड. बी. बी. घाटगे, साईओ डी. के. मायदेव आदी.

यावेळी बोलताना श्री. धर्माधिकारी पुढे म्हणाले, सभासदांनी आपले हक्क, अधिकार व कर्तव्ये याविषयी नेहमी सजग असायला हवे. संस्थेच्या दैनंदिन कामकाजाबाबतही सतर्क राहण्याबरोबरच चुकीच्या गोष्टीबद्दल सर्वसाधारण सभेत जाब विचारायला हवा. तरच लोकांच्या सहभागातून उभारलेल्या संस्था आणि त्या संस्थेतील जनतेचा पैसा सुरक्षित राहिल असे सांगितले.

डॉ. राजन गवस बोलताना म्हणाले, सहकाराचे मूळ हे कृषी संस्कृतीमध्येच आहे. त्याचा शोध हा स्त्रियांनी लावला. सहकार्याच्या भावनेतून शेतकऱ्यांनी सहकाराची जपणूक केली. त्यांनी कधीही कुठेलेही कर्ज, संस्था बुडवली नाही. परंतू तथाकथित शिकलेल्यानीच अनेक संस्था बुडवल्या. त्याला आळा घालण्यासाठी सहकार चळवळीतील मूल्यांच्या जोपासनेची गरज आहे. सध्या कर्जाच्या व्यवहारात स्टॅम्प आला असून यापासून सतरा ठिकाणी कर्ज काढण्याचे प्रकार सुरू झाल्याचे सांगत काही वर्षापुर्वी 'मिशिचा केस' आणि आता स्टॅम्प य्रातील फरक सांगितले. या स्टॅम्पमुळे लाज, अब्रू, धाक आणि विश्वास, शब्दांची किंमत हद्दपार झाल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी बोलताना ॲड. घाटगे म्हणाले, सभासदांचे हक्क, कर्तव्य, अधिकार आणि जबाबदाऱ्यांविषयी सभासद जागरूक असतील तरच सहकारी संस्थेची वाटचाल योग्य दिशेने राहिल. सुत्रसंचालन संपदा घुगरे यांनी केले तर आभार प्राचार्य एस. एस. निळपणकर यांनी मानले.

यावेळी प्रा. विजयकुमार घुगरे, प्रा. विजय आरबोळे, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव, प्रा. जे. बी. केसरकर, पा. रा. शिंगटे, प्राचार्य सुरेश चव्हाण, प्रा. महावीर मरजे, बी. बी. देसाई, एन. एन. कोलते, संदीप कागवाडे, शंकर नेवडे, शाखाधिकारी अशोक सुळकूडे उपस्थित होते.

सकाळ

# तत्त्वे जपल्याने 'रवळनाथ'ची प्रगती

## महेश धर्माधिकारी; गडहिंग्लजमध्ये 'रवळनाथ'तर्फे सभासद प्रशिक्षण




गडहिंग्लज : प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना महेश धर्माधिकारी. शेजारी डॉ. राजन गवस, एम. एल. चौगुले, ॲड. बी. बी. घाटगे, डी. के. मायदेव.

गडहिंग्लज, ता. १० : 'रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन, पारदर्शक कारभार, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व सामाजिक बांधिलकी आदी सहकारातील मूलतत्त्वे जपल्यामुळे श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीची अल्पावधितच प्रगती झाली आहे,' असे गौरवोद्गार कोल्हापूर महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष महेश धर्माधिकारी यांनी काढले.

नवी दिल्लीच्या राष्ट्रीय सहकारी संघ व श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. रवळनाथच्या येथील प्रधान कार्यालयात ही कार्यशाळा झाली. यावेळी आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्राचार्य शंकर देसाई यांचा, तर कर्मवीर गुणवंत शिक्षक पुरस्काराबद्दल प्रा. महेश चौगुले यांचा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते सत्कार झाला. धर्माधिकारी यांनी सभासदांनी सतर्क राहण्यासह चुकीच्या गोष्टीबद्दल सर्वसाधारण सभेत जाब विचारला तरच लोकांच्या सहभागातून उभारलेल्या संस्था व त्यातील पैसा सुरक्षित राहील, असे सांगितले. डॉ. गवस म्हणाले, ''तथाकथित शिकलेल्यांनीच अनेक संस्था बुडवल्या. त्याला आळा घालण्यासाठी सहकारी चळवळीतील मूल्यांच्या जोपासनेची गरज आहे.'' ॲड. बी. बी. घाटगे यांनी हक्क, अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या याविषयी सभासद जागरूक असतील तरच सहकारी संस्थांची वाटचाल योग्य दिशेने राहील. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत, संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले. संचालक प्राचार्य आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले. यावेळी संचालक व सभासद उपस्थित होते.

लोकमत

# सहकार टिकण्यासाठी विवेक जागवा

## राजन गवस : गडहिंग्लज येथे 'रवळनाथ'तर्फे कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : सहकारी क्षेत्रातील संचालकांची भूमिका विश्वस्तांची आहे. परंतु, शिकलेल्यांनीच विश्वस्त संकल्पनेला हरताळ फासल्यामुळे सहकार बदनाम झाला. म्हणूनच सहकार टिकण्यासाठी, वाढण्यासाठी सहकारातील सर्वांचा विवेक जागविण्याची गरज आहे, असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय सहकारी संघ व रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष महेश धर्माधिकारी, कायदेतज्ज्ञ बी. बी. घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

घाटगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले. रामचंद्र निळपणकर यांनी आभार मानले.



### मिशीचा केस अन् स्टॅम्प

उत्तूर परिसरातील एक सावकार कर्ज घेणाऱ्यांकडून मिशीचा केस घेत असे. त्याचे कर्ज कुणीही बुडविल्याचे ऐकिवात नाही. पुढे कर्जाच्या व्यवहारात स्टॅम्प आला. तेव्हापासून स्टॅम्प देऊन १७ ठिकाणी कर्ज काढण्याचे प्रकार सुरू झाले. त्यामुळे अनेक संस्था अडचणी आल्या. 'स्टॅम्प'मुळेच लाज, अब्रू, शब्दाची किंमत हद्दपार झाली, असेही गवस यांनी सांगितले.

पुढारी




गडहिंग्लज : येथे रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या सभासद प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राजन गवस, शेजारी संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले व इतर.

# शिकलेल्यांकडूनच विश्वस्त संकल्पनेला हरताळ : गवस

## गडहिंग्लज येथे 'रवळनाथ'तर्फे सभासद प्रशिक्षण

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

सहकारी क्षेत्रातील संचालकांची भूमिका ही विश्वस्तांची आहे. परंतु, शिकलेल्यांनीच विश्वस्त संकल्पनेला हरताळ फासल्यामुळे सहकार बदनाम झाला, असे परखड मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघ आणि श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष महेश धर्माधिकारी यांनी 'सभासदांचे हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या' या विषयावर मार्गदर्शन केले. कायदेतज्ज्ञ ॲड. बी. बी. घाटगे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी बँकेचे सर्व संचालक, शाखाधिकारी, सभासद उपस्थित होते. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचलन तर प्राचार्य आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले.